**शपथेवर खरे सांगतो की,**

**साक्षीदाराचे नाव - भोलेनाथ नारायण जगताप**
**वय - ४२ वर्षे,**
**हुद्दा - ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे,**
**राहणार - कळंबोली, ता. पनवेल**

**सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:-**

मला साक्षीसमन्स मिळाले असुन त्यावरून मी साक्ष देण्यासाठी आलो आहे. वादी तुकाराम दत्तात्रय पाटील यांनी आमच्याकडे दिनांक ०९/०२/२००७ रोजी ग्रामसभा झाल्याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारात मागितली. त्यांच्या अर्जास मी उत्तर दिले होते. सदरहू उत्तर मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर रेकॉर्ड तपासल्याप्रमाणे व माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१६३** देण्यात येते. मी पत्रात दिलेल्या माहितीनुसार दिनांक ०९/०२/२००७ रोजी ग्रामसभा झाल्याचे इतिवृत्त ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध नसल्याची माहिती मी दिलेली आहे. ती माहिती देताना मी संपुर्ण रेकॉर्ड संचिका तपासुन माहिती दिलेली आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र.२१ ते ४० तर्फे :-**
**वि. अधिवक्ता यांनी उलटतपास घेणार नसल्याचे प्रतिपादन केले.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे**
**प्रतिवादी क्र.१ ते १८ यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.१ ते १८ तर्फे उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१९ तर्फे अॅड. एस. के. राणे:-**

२. मी जिल्हा परिषदेत सन २००० ते २००५ पासुन कार्यरत आहे. माझी पहिली पोस्टींग सांगली, इस्लामपुर येथे झाली होती. सन २०१२ मध्ये रायगड जिल्हयात मी सेवेत आलो. माझी नेमणुक सन २०२४ मध्ये ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे येथे झाली. दिनांक २९/१२/२०२५ रोजी माहिती अधिकाराखाली आलेल्या अर्जाची मी आमच्या ग्रामपंचायत दप्तरी नोंदणी करून घेतली. मी मला दिलेल्या अर्जाची प्रत आज सोबत आणलेली नाही. अर्जात सन २००७ च्या प्रोसिडींगबाबत माहिती मागविली होती. सन २००७ मध्ये या ग्रामपंचायतीवर कोण ग्रामसेवक व सरपंच होते याची मी माहिती घेतली होती. फेब्रुवारी २००७ मध्ये कोण ग्रामसेवक व सरपंच होते हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सेवेत असलेले ग्रामसेवक, त्यांचा कालावधी, तसेच त्या कालावधीत असलेले सरपंच, उपसरपंच यांचा ग्रामपंचायतीत बोर्ड असतो. फेब्रुवारी २००७ मध्ये असलेले ग्रामसेवक यांना मी फोन करून त्या वेळची माहिती विचारली, परंतु त्यांचा फोन बंद होता. त्यानंतर सन २००७ मध्ये असलेले ग्रामसेवक कार्यरत आहेत असे मला चौकशी केल्यावर समजले. ते कार्यरत असल्याची माहिती मला मित्राकडून समजली. यापुर्वीचे ग्रामसेवक माझे मित्र जनार्दन सरडे यांच्याकडून सन २००७ मध्ये असलेले ग्रामसेवक कार्यरत असल्याची मला माहिती मिळाली. सन २००७ मध्ये सेवेत असलेल्या ग्रामसेवकांचे नाव पाटोळे असुन ते रायगड जिल्हयात सध्या कार्यरत आहेत. दिनांक २९/१२/२०२५ ला अर्ज आल्यानंतर दिनांक ०७/०१/२०२६ रोजी मी उत्तर दिले असुन अर्ज आल्यानंतर त्या वर्षाचे पुर्ण दप्तर, प्रोसिडींग, फाईल्स यांची मी तपासणी केली. इतिवृत्ताचे रजिस्टर उपलब्ध असुन त्यांनी केलेली मागणी त्या रजिस्टरला दिसुन येत नाही. दिनांक ०९/०२/२००७ रोजी

तत्कालीन ग्रामसेवक पाटोळे व सरपंच पवार यांनी जे ठराव झाले होते, त्याची नक्कल दिलेली होती किंवा नाही हे मला माहीत नाही. ती मला आढळुन आली नाही. जावक रजिस्टरवर नक्कल दिल्याबाबत दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ मध्ये ग्रामपंचायत वांगणी तर्फे वाजे येथे झालेल्या घडामोडींबाबत व घटनांबाबत मला वैयक्तिक माहिती नाही. पाटोळे यांचा फोन न लागल्याने मी त्यांच्याकडून माहिती केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामस्थांच्या दबावामुळे मी चुकीचे उत्तर दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दप्तराची कोणतीही कागदपत्रे न आणता व पडताळणी न करता मी खोटी साक्ष देत आहे. या विषयाबाबत माझ्याकडे दप्तर उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलीही व्यक्तीश: माहिती नसुन कागदपत्र पडताळणी न करता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.२० व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.२० तर्फे उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्र.४१ ते ४८ व त्यांचे वि. अधिवक्ता यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादी क्र.४१ ते ४८ तर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

पनवेल
दिनांक : ०४/०३/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल